# MT EDUCARE LTD.

**QUEST- I (Semi Prelim - I)**
**2018 - 19**

**पाठ - १ ते ६, पद्य - १ ते ३ स्थूलवाचन - १, ३**
**व्याकरण, उपयोजित लेखन**

---

**CBSE - X** **Set - B**

**Roll No.** | | | | | | | | **Code No. 52/1**

**Series LRH/1**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| • | खण्डः क | : | १. अपठित गद्य उतारा<br>२. अपठित गद्य उतारा | 12 गुण |
| • | खण्डः ख | : | रचनात्मक लेखन<br>१. निबंध लेखन किंवा कथालेखन<br>३. पत्र लेखन | 12 गुण |
| • | खण्डः ग | : | व्याकरण | 16 गुण |
| • | खण्डः घ | : | साहित्य : गद्य, पद्य, स्थूलवाचन | 40 गुण |

***Time allowed* : 3 hours** ***Maximum Marks* : 80**

# MARATHI

**General Instructions :**

(१) चार खंड आहेत - क, ख, ग आणि घ.

(२) सूचनेप्रमाणे सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

(३) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवावेत.

## खंड 'क'

**Q.1. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

महाराष्ट्र हा संतांचा देश आहे. येथे संतांची वाणी अमाप पिकते. ही संतांची परंपरा गेली सात शतके अखंडीत चालू आहे. लोकसेवेचे महान मंदिर संतांनी या महाराष्ट्रात उभारले. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला. नामदेवांनी त्याच्या भिंती बांधल्या. एकनाथांनी त्यावर घुमट बांधला, तर तुकोबांनी त्यावर कळस चढवला. गाडगेबाबांनी त्या कळसावर पताका चढविली. ज्ञानोबांपासून गाडगेबाबांपर्यंत सर्व संतांचे म्हणणे एकच: 'देव देवळात नाही, दगडात नाही, तर तो माणसात आहे.' दुर्दैवाची गोष्ट ही की, संतांनी सात शतके आकाशपाताळ एक केले, तरी माणसांतला परमेश्वर अजून लोकांना दिसत नाही. त्यांना दगडातला परमेश्वर दिसतो. गाडगेबाबांनी लक्षावधी लोकांना सतत ओरडून सांगितले, ''बाबांनो, दगडधोंड्यांची पूजा नका करू रे, माणसांची पूजा करा.'' गाडगेबाबांनी जीवनभर भिकाऱ्यांची, पांगळ्यांची, रोग्यांची आणि जनावरांची पूजा केली. गरिबांचा उद्धार हा एकच त्यांचा कीर्तनाचा विषय असे.

प्रश्न :

१. सर्व संतांच्या मते देव कुठे असतो ? **1**

२. गाडगेबाबांनी जीवनभर कोणाची पूजा केली ? **1**

अ) श्रीमंतांची ब) रोग्यांची

क) देवाची ड) दगडांची

३. गाडगेबाबांनी लक्षावधी लोकांना ओरडून काय सांगितले ? **2**

४. गाडगेबाबांच्या कीतर्नाचा विषय कोणता असे ? **2**

**Q.2. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

घरोघर सुंदर पुष्परचना असतेच असते. ती एक जपानी कला आहे आणि शास्त्रही आहे. चहापंडितांसारखे पुष्पपंडितही इथे होऊन गेले. ह्याही कलेची घराणी आहेत. घराण्यांचे नियम आहेत. पुष्परचना शिकवणारी विद्यालये आहेत. एखादीच डहाळी आणि एखादेच फूल यांतून हे जपानी लोक पुष्पकाव्य निर्माण करतात. कित्येक वेळा तर ही रचना मोठी सूचक असते. त्यांतून प्रियकर-प्रेयसी परस्परांचे मनोगत व्यक्त करतात. पुष्परचनेला जपानीत इकेबाना म्हणतात. बुद्धदेवांच्या चरणांशी पुष्परचनेचा विकास झाला. फुलेच काय पण वाळलेल्या काटक्यांतून सुद्धा हे जपानी लोक सुंदर चित्रकृती तयार करतात. प्रत्येक जपानी स्त्रीला पुष्परचनेची कला थोड्याफार प्रमाणात येत असते. वास्तविक हिंदू जीवनात आपल्या पूर्वजांनी फुलांची गुंफण चतुराईने केली होती ! पण प्रथम मुसलमानांच्या आणि नंतर इंग्रजांच्या गुलामगिरीत आम्ही कितीतरी परंपरा मोडल्या. जुन्या मोडल्या आणि नव्या नीट जोडल्या नाहीत म्हणून सारा समाज कसा लडबडतोय ! नव्या शहरी जीवनाच्या वरवंट्याखाली ती वृक्ष-वेली-पाने-फुले पार चेचली गेली. माणसाला राहायला घरे हवीत म्हणून पन्नास-पन्नास वर्षांचे सुंदर वृक्ष आम्ही कुऱ्हाडी घालून तोडतो. नवी झाडे लावण्याचे सरकारी संकल्प सुटतात.

जपानी जीवनात फुलाला फार महत्त्व आहे. पुष्परचना नाही असे घरच काय पण साधे दुकान पण नाही. मी तर टोकियोतल्या टॅक्सीवाल्यांनी टॅक्सीत फुलदाण्या ठेवलेल्या पाहिल्या आहेत. मुंबईत दिवसाला लाख रुपयांची फुले खपतात ही बातमी वाचून काही लोकांनी हाय खाल्ली. मला तर ते वाचून मुंबईकरांबद्दल आशा वाटायला लागली.

**प्रश्न :**

१. नव्या शहरी जीवनाच्या वरवंट्याखाली ती वृक्ष-वेली-पाने-फुले पार चेचली गेली. वरील वाक्य कोणत्या प्रयोगातले आहे ? **1**
अ) कर्तरी प्रयोग ब) कर्मणी प्रयोग क) भावे प्रयोग

२. बुद्धदेवांच्या चरणांशी पुष्परचनेचा विकास झाला. वरील विधानासाठी प्रश्न तयार करा. **1**

३. इकेबानाबद्दल थोडक्यात माहिती द्या. **2**

४. भारतीय समाजाबद्दल लेखकाने कोणती खंत व्यक्त केली आहे ? **2**

## खंड 'ख'

**Q.3. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा. (कोणतेही एक)** **7**

१. **माझे आवडते शिक्षक**
(**मुद्दे** :- शिक्षकाचे नाव - त्यांचा शिकविण्याचा विषय - शिक्षक आवडण्याची कारणे - त्यांचा स्वभाव - गुण, राहणी - विद्यार्थ्यांना नेहमी मदत - शिकविण्याचे कौशल्य - त्यांच्याविषयी प्रेम - आदर - आपल्या जीवनात त्याचे स्थान - शेवट.)

२. **शाळा बंद झाल्या तर ....**
(**मुद्दे** :- ही कल्पना कशी सुचली ? - तुम्ही कसे वागाल - फक्त खेळ मनोरंजन - कल्पनेचे दुष्परिणाम - प्रगती नाही - सर्वत्र अज्ञानाचा अंधार - वाईट परिस्थिती - कल्पना भयंकर - शेवट)

३. **मी राष्ट्रध्वज बोलतोय ....**
(**मुद्दे** :- प्रस्तावना - राष्ट्रध्वज देशाची ओळख - अस्तिवाचे प्रतिक - राष्ट्रध्वजाचा गौरवशाली इतिहास - ध्वजाचे स्वरूप - प्रतित अर्थ - त्याग, बलिदान, देशभक्तीची भावना - सध्याची स्थिती - दुःख)

**किंवा**

**दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा. गोष्टीला शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.** **7**

**मुद्दे** : एक व्यापारी – अंगठी चोरीस जाणे – नोकरांवर संशय – प्रकरण कोर्टात जाणे – न्यायाधिशाची युक्ती – समान उंचीच्या काठ्या देणे – 'अंगठी चोराची काठी दोन इंच वाढेल' – दुसऱ्या दिवशी सर्व नोकरांच्या काठ्या बघणे – एकाची दोन इंच लहान – चोर पकडणे – अंगठी परत मिळणे – तात्पर्य.

**Q.4. खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

१. संदिप/ सुदिपा चव्हाण, लोकमान्य टिळक रोड, भांडूप (पू.), मुंबई - ४२ हा/ ही रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणाऱ्या व्यत्ययाबद्दल पोलीस इन्स्पेक्टर, भांडूप पोलीस स्टेशन, मुंबई - ४२ यांच्याकडे तक्रार करतो/ करते. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

२. समीर देशमुख/ समिरा देशमुख, सेनापती मार्ग, पुणे हा/ ही व्यवस्थापक, मुलुंड स्पोर्टस्, मुलुंड, मुंबई -११, यांच्याकडे खेळाच्या साहित्याची मागणी करतो/ करते.या पत्राचा नमुना तयार करा. (लिफाफा आवश्यक)

**खंड 'ग'**

**Q.5. अ) खालील प्रश्न सूचनेप्रमाणे सोडवा.** **4**

१. त्या <u>तेजस्वी</u> नेत्रांत शांत भाव तरळत होता. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)
२. मी तुझ्या घरी उद्या येईन. (क्रियाविशेषण अव्यय ओळखा)
३. अरेरे ! तो नापास झाला. (केवलप्रयोगी अव्यय ओळखा)
४. देव त्यांचे कल्याण करो. (सर्वनाम ओळखा)

**Q.5. आ) पुढील वाक्ये कंसातील सुचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१. प्रीतमने गाणे गायले. (प्रयोग ओळखा)
२. शिक्षकांनी आम्हां विद्यार्थ्यांना चांगले घडविले. (प्रयोग ओळखा)
३. तुला याबद्दल काय वाटते ? (आज्ञार्थी करा)
४. शांततेला खूप आवाज असतो. (उद्गारार्थी करा)

**Q.5. इ) पुढील वाक्यातील काळ ओळखा.** **2**

१. भीम लाडू खात असतो.
२. खूप पाऊस पडत होता.
३. मुलांनी अभ्यास केला असेल.

**Q.5. ई) पुढील शब्दांचे लिंग बदला.** **2**

१. प्राध्यापक - .............    २. महाराज - .............
३. लेखक - .............    ४. माळी - .............

**Q.5. उ) पुढील शब्दांचे वचन बदला.** **2**

१. यंत्र - .............    २. जोडपे - .............
३. दिवा - .............    ४. तार - .............

**Q.5.** ऊ) **पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **2**

१. नदी - .............   २. पाणी - .............
३. रात्र - .............   ४. पर्वत - .............

**Q.5.** ए) **पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **2**

१. आदर - .............   २. स्मृती - .............
३. लाभ - .............   ४. कर्कश - .............

**खंड 'घ'**

**Q.6.** अ) **योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही चार)** **4**

१. मास्तर .......... चालले याचंच कौतुक अधिक होतं.
(अमेरिकेत, रशियात, परदेशात, जपानला)
२. त्यांच्या मस्तकी.... साफा होता. (भगवा, हिरवा, पांढरा, निळा)
३. बजाजवाडी हे चालते-बोलते .......... होते. (तीर्थक्षेत्र, पुण्यक्षेत्र, पवित्रक्षेत्र, दानक्षेत्र)
४. .......... इंग्रज माणूस जरा दूर पायऱ्यांवर येऊन बसला.
(अशिक्षित, सुसंस्कृत, सभ्य, सुशिक्षित)
५. तुम्हांला तुमच्या खोलीतून .......... दिसतो तसा मजला इथं हिमालय दिसतो.
(समुद्र, सागर, डोंगर, पर्वत)
६. हे सुचवतानाच मला एक ........... सूचनाही द्यायची आहे.
(कामाची, धोक्याची, संकटाची, महत्त्वाची)

**Q.6.** आ) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही सहा)** **6**

१. ऋतुचक्रासोबत कोणाशी नाते सांगायचे?
२. हिमालयाची शुभ्रधवल हिमशिखरं लेखकाला कोठे दिसू लागली?
३. 'माझं विद्यापीठ' या काव्यसंग्रहास एकूण किती पुरस्कार मिळाले?
४. गोऱ्या कपाळाखाली असलेल्या काळ्याभोर नेत्रात कोणते तेज सामावलेले होते?
५. १९३५ साली लेखक कोठे राहावयास आले?
६. कोणत्या गप्पा अधिक सुंदर असतात?
७. हिमालयात येण्यापूर्वी लेखकाला कधी न ऐकलेला असा कोणता आवाज जाणवला?
८. लेखकाने 'आमचे गुरूजी' असे कोणास म्हटले आहे?

**Q.7.** अ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही तीन) **6**

१.




२.




३.




४.




५.




**Q.7.** आ) खालील प्रश्नांची ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) **6**

१. परिवर्तनात कोणत्या भिंती ओलांडणे, लेखिकेस अपेक्षित आहे?

२. 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे' असे कृष्णाबाई का म्हणतात?

३. स्वामी विवेकानंद व राजा रविवर्मा यांच्या भेटीस 'अपूर्व भेट' असे का म्हटले आहे?
४. लेखकाची खरी शिक्षणसंपत्ती कोणती ठरली, ते सविस्तर लिहा.

**Q.8. अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही चार)** **4**

१. नाही माझ्या घरट्यात चांदरातीचे ........ (प्रभावळ, मोहोळ, साकळ, प्रभाव)
२. जिथे ........ तेथे उभा श्याम आहे. (काम, सीताराम, राम, श्रीहरी)
३. कृपा करी ........ । दीनानाथ तूं समर्था ।। (एकनाथा, द्वारकानाथा, पंढरीनाथा, विठ्ठला)
४. अभ्रीची ........ काय साच खरी । (माया, छाया, काया, वाचा)
५. आजि दिवाळी दसरा। ........ म्हणे आले घरा ।। (सेना, नामा, तुका, ज्ञाना)
६. खुले हसणे दिसेल माझ्या ........ ओठी । (पक्ष्यांच्या, चिमण्यांच्या, पिल्लांच्या, पाखरांच्या)

**Q.8. आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **3**

१. माणूस खरे सुख कशात मानतो?
२. संत नरहरी सोनार यांनी दीनानाथ कोणास म्हटले आहे?
३. संत सेना महाराज यांना सुख केव्हा झाले?
४. कवीच्या घरट्यात मंद्र सप्तकात कोण गाते?
५. कवीच्या मते कोण 'श्रमांचा पुजारी' आहे?

**Q.9. अ) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. (कोणतेही एक)** **3**

१. 'वसे तो सदा स्वेदगंगेकिनारी'
२. सोयरा म्हणे अंती कोण सोडवील । फजिती होईल जन्मोजन्मी ।।
३. नाही माझ्या घरट्यात कधी कपाळाला आठी
खुले हंसणे दिसेल माझ्या चिमण्यांच्या ओठी

**Q.9. आ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही दोन)** **4**

१.




२.



३. संसारासाठी वापरलेली विशेषणे

............. | .............

**Q.10. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **4**

१. रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना काय केले पाहिजे असे लेखिकेला वाटते?

२. रत्नागिरी गावातील कोणती वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत?

३. कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

***Best of Luck***